आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२९ एप्रिल २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर /दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक, दीड लाखापेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

- विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून अंबादास दानवे यांची उमेदवारी जाहीर, काँग्रेसही उमेदवार देणार

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ९० टक्के मतदान

**आणि**

- नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणी शरद कळसकरला उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात राज्यानं महत्त्वाकांक्षी पाऊल टाकत महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र  फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. या धोरणांतर्गत राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक होणार असून दीड लाखांपेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. राज्यभरात सहा एआय उत्कृष्टता केंद्रांची स्थापन होणार असून पाच एआय इनोव्हेशन शहरांची स्थापना करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. याशिवाय लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही या बैठकीत झाला.

राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवडीकरता महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम हाती घेतली असून हरित महाराष्ट्र आयोगाच्या स्थापनेचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. राज्यातल्या हरित उर्जेचा वापर वाढवण्यासाठी १२ हजार ३०३ कोटी रुपयांच्या मॅजेस्टिक योजनेलाही आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातल्या उच्च माध्यमिक परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतला आहे. आता दिव्यांग विद्यार्थ्यांना विद्यापीठ, परीक्षा बोर्ड, संस्थेला भरावं लागणारं शुल्क, प्रवेश

शुल्क, शिक्षण शुल्क, नोंदणी शुल्क, ग्रंथालय, नियतकालिकांसाठी, वैद्यकीय तपासणीसाठी शुल्क मिळणार आहे.

राज्यातल्या स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांमधल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बारा आणि चोवीस वर्षांच्या नियमित सेवेनंतरची दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करायलाही आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

<><><><>

विधानपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा केली आहे. ते उद्या उमेदवारी अर्ज दाखल करतील असं खासदार संजय राऊत यांनी सांगितलं. दुसरीकडे काँग्रेसही या निवडणुकीत उमेदवार देणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केलं आहे. तर विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी  भाजपाने प्रज्ञा सातव यांना उमेदवारी दिली आहे. प्रज्ञा सातव यांनी काही महिन्यांपूर्वी विधानपरिषद सदस्यपदाचा राजीनामा देत भाजपामधे प्रवेश केला होता.

१३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह ९ जण निवृत्त होत आहेत. त्याआधी १२ मे ला विधानपरिषदेची निवडणूक होणार आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून आज अधिकृत नावाची घोषणा करण्यात येईल आणि उद्या उमेदवारी अर्ज भरला जाईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिली.

<><><><>

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांनी विधान परिषदेची निवडणूक लढवण्याची इच्छा असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र याबाबत शिवसेनेबरोबर अद्याप कोणतीही चर्चा झालेली नाही, तसंच शिवसेनेकडूनही आपल्याला कोणतीही माहिती मिळालेली नाही, असंही बच्चू कडू यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><>

बीडमध्ये मस्साजोग गावात सरपंचपदाची पोटनिवडणूक काल झाली. आधीचे सरपंच संतोष देशमुख यांची २०२४ मध्ये हत्या झाल्यामुळे घेतलेल्या कालच्या पोटनिवडणुकीत संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांचा पराभव झाला आहे.  स्वरुपानंद देशमुख

यांनी ९२ मतांनी त्यांचा पराभव केला. त्याआधीच्या निवडणुकीत संतोष देशमुख यांनी स्वरुपानंद देशमुख यांच्यावर अवघ्या दहा मतांनी विजय मिळवला होता.

<><><><><>

धुळे शहर विधानसभा मतदारयादीचं सखोल पुनरीक्षणाच्या पूर्वतयारीच्या कामात दिरंगाई करणाऱ्या १८ केंद्रस्तरीय बीएलओ अधिकाऱ्यांना धुळे जिल्हाधिकाऱ्यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. याशिवाय तीस टक्क्यांपेक्षा कमी काम पूर्ण करुन देणाऱ्या २३ कर्मचाऱ्यांचं १५ दिवसांचं वेतन कापण्याचे आदेशही दिले आहेत.

<><><><><>

पश्चिम बंगाल विधानसभेच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात १४२ मतदारसंघांमध्ये आज संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सुमारे ९० टक्के मतदान झालं. सर्वात जास्त मतदान पूर्व वर्धमान जिल्ह्यात ९२ पूर्णांक ५ दशांश टक्के, तर सगळ्यात कमी मतदान कोलकाता दक्षिण या मतदार संघात ८६ पूर्णांक ११ शतांश टक्के इतकं झालं आहे.

काही ठिकाणच्या किरकोळ घटना वगळता आज मतदान शांततेत झालं. भवानीपूर मतदारसंघातल्या एकबलपूरमध्ये भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. पोलीस तसंच केंद्रीय सुरक्षा दलांनी परिस्थिती आटोक्यात आणली. फाल्ता मतदारसंघातल्या काही मतदान केंद्रांवर भाजपा उमेदवारांच्या नावापुढच्या बटनावर सेलो टेप लावली होती असे आरोप करत भाजपानं त्या मतदान केंद्रावर पुन्हा मतदान घेण्याची मागणी केली आहे.

<><><><><>

नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणातला आरोपी शरद कळसकर याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयानं आज मंजूर केला. या प्रकरणी सत्र न्यायालयानं कळसकरला दोषी ठरवलं आहे. या निकालाविरोधात कळसकरनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणीही कळसकरवर खटला सुरु आहे.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ६०९ अंकांची वाढ झाली, आणि तो ७७ हजार ४९६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १८२ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार १७८ अंकांवर बंद झाला.

ग्राहकोपयोगी वस्तू, स्थावर मालमत्ता, उर्जा इत्यादी क्षेत्रांमधल्या कंपन्यांचे समभाग आज तेजीत राहिले.

आज रुपया ३० पैशांनी घसरला. परकीय चलन विनिमय बाजारात हा दर प्रतिडॉलर ९४ रुपये ८५ पैसे इतका राहिला.

<><><><><>

येत्या वर्षात संभाव्य चारा टंचाई टाळण्याच्या दृष्टीने चारा उत्पादन कार्यक्रम अंतर्गत चारा बियाणे वाटप करण्यात येणार आहे. सिंचनाची सोय तसंच ज्यांच्याकडे पशुधन आहे अशा लाभधारकांना शंभर टक्के अनुदानावर चारा बियाणं वितरीत करण्यात येणार आहे. एल-निनो या हवामान घटकांचा प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता असल्यानं चारा टंचाईचा परिणाम होऊ नये या हेतूने इच्छूक शेतकऱ्यांनी ५ मे पर्यंत आपले अर्ज आपल्या गावातल्या पशुवैद्यकिय संस्थेकडे सादर करावीत, असं आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागानं केलं आहे.

<><><><><>

दुसरं आंतरराष्ट्रीय हृदयंगम मराठी साहित्य संमेलन पूर्व आफ्रिकेतल्या केनिया देशाच्या राजधानीचं शहर असलेल्या नैरोबीत रंगणार आहे. हे संमेलन महाराष्ट्रदिनी सुरु होऊन, दोन मे रोजी त्याचा समारोप होणार आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेच्या पुढाकारानं होत असलेलं हे संमेलन राज्याचा मराठी भाषा विभाग, विभव इंटरनॅशनल आणि नैरोबी महाराष्ट्र मंडळ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलं आहे. नामवंत साहित्यिक डॉ. रवींद्र शोभणे या संमेलनाचं अध्यक्षपद भूषवणार आहेत.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना होणार आहे. मुंबईत वानखेडे मैदानावर, थोड्याच वेळात, साडे सात वाजता हा सामना सुरु होईल.

मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

राज्यात उष्णतेची लाट असून, अकोला जिल्ह्यात आतापर्यंत उष्माघाताच्या सर्वाधिक ७२ रुग्णांची नोंद झाली आहे. ५५ रुग्णांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आलं असून, उर्वरित

रुग्णांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती अकोल्याचे आरोग्य उपसंचालक सुशील वाघचौरे यांनी दिली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली तर मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, विदर्भात अनेक ठिकाणी आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली.

चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये येत्या तीन दिवसात मेघगर्जनेसह वादळी वारे वाहतील असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यात इतरत्र सर्वत्र हवामान कोरडं राहील.

**//<><><><><>//**